अप्पर जिल्हाधिकारी

वाचले :

१) कार्यकारी अभियंता,विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग,कोल्हापूर यांचा दिनांक ०५/०७/२०२१ रोजीचे पत्र
२) उपवनसंरक्षक,कोल्हापूर वनविभाग,कोल्हापूर यांचेकडील जा.क्र.ब/कक्ष-५/वनसंवर्धन/२०२१-२२/६१६ कोल्हापूर दिनांक २९/०६/२०२१ रोजीचे पत्र
३) उप अधिक्षक भूमि अभिलेख,शाहूवाडी यांचेकडील दिनांक २६/०६/२०२२ रोजीचा मोजणी नकाशा
४) सहाय्यक अभियंता,महावितरण शाखा शाहूवाडी यांचेकडील स.अ./शाहूवाडी/तांत्रिक-२५५ दिनांक ०६/०९/२०२१ रोजीचे पत्र
५) महाराष्ट्र शासन,सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्रमांक-पीएलएन-२०२१/सी.आर.४७१/नि-३ मंत्रालय,मुंबई दिनांक २६/०२/२०२१ अन्वये प्रशासकिय मान्यता
६) तहसिलदार शाहूवाडी यांचेकडील क्र.जमीन/वशी/६४९/२०२१ दिनांक ०५/१०/२०२१ अन्वये अहवाल
७) उपविभागीय अधिकारी पन्हाळा यांचेकडील क्र.जमीन/कावि/४२७/२०२१ दिनांक ११/१०/२०२१ अन्वये अहवाल
८) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब महसूल व वन विभाग मंत्रालय,मुंबई दिनांक ३१ डिसेंबर २०१५
९) इकडील आदेश क्र.कार्यासन क्र.३ड/आरआर/४६१/२१ दिनांक १२/०८/२०२१

---

क्र.कार्या.३-अ/जमिन मागणी/एसआर/१३२/२२
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर
दिनांक :-२८/१०/२०२२

**-: आदेश :-**

कार्यकारी अभियंता,विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग,कोल्हापूर यांनी वाचले क्र.१ अन्वये केर्ली-कोतोली-नांदगाव-नांदारी राज्य मार्ग क्र.१९१ (कि.मी.००/०० ते कि.मी.२९/५००) भाग केर्ली फाटा-नांदारी जिल्हा कोल्हापूर या रस्त्याची सुधारणा करणेचे काम आशियाई विकास बँक अर्थसहाय्य अंतर्गत मंजुर आहे.सदर रस्त्यामध्ये मौजे-पोर्ले तर्फे ठाणे,उत्रे ता.पन्हाळा व मौजे-नांदारी,माळापुडे,कातळेवाडी ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर या गावातील क्षेत्र २ हे.१५ आर वन जमीन बाधीत होत आहे.त्यास अनुसरून वनसंवर्धन (अधिनियम) १९८० अंतर्गत वन जमिनीचा प्रस्ताव मा.उप वनसरंक्षक,कोल्हापूर वन विभाग,कोल्हापूर यांचे कार्यालयाकडे जमा केला आहे. सदर वन जमिनीच्या बदल्यात वन विभागास वनेत्तर पर्यायी जमीन हस्तांतरीत करणे वनसंवर्धन (अधिनियम) १९८० अंतर्गत बंधनकारक आहे.त्यामुळे मौजे-मांजरे ता.शाहूवाडी येथील सर्व्हे क्रमांक ४७ मधील २ हे.१५ आर पर्यायी वनीकरणासाठी वनेत्तर जमीन मिळणेस विनंती केली आहे.

उपविभागीय अधिकारी पन्हाळा यांनी वाचले क्र.७ अन्वये, कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग कोल्हापूर यांनी मौजे मांजरे ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर येथील जमीन गट नं. ४७ मधील क्षेत्र २.१५.०० हे.आर. जमीन वनविभागास हस्तांतरीत करणेबाबतची मागणी केलेली असलेने विचार होणेस योग्य वाटते असे तहसिलदार शाहूवाडी यांनी अभिप्रायामध्ये नमुद केले आहे. तहसिलदार शाहूवाडी यांचेकडील प्राप्त अहवाल व सोबत जोडले कागदपत्रांचे अवलोकन करता, मौजे मांजरे ता. शाहूवाडी येथील जमीन गट नं. ४७ मधील वन जमीनीस लागून सरकारी मुलकीपड ३७.०९.०० हे.आर. पैकी २.१५.०० हे.आर क्षेत्र हे पर्यायी वनीकरणासाठी वनविभागास हस्तांतरीत करणेस हरकतीचे नाही.असा अभिप्राय सादर केलेला आहे.

तसेच वाचले क्र.३ अन्वये उपवनसंरक्षक,कोल्हापूर वनविभाग,कोल्हापूर यांनवनक्षेत्रपाल पेंडाखळे यांचे अभिप्राय नुसार मौजे-मांजरे ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर येथील गट क्र.४७ मधील २ हे.१५ आर क्षेत्राची प्रत्यक्ष जागेवर जावून स्थळ पहाणी करून सदरचे क्षेत्रामध्ये अतिक्रमण दिसून येत नाही.तसेच सदरच्या क्षेत्रात सद्यस्थिती ०.३घनतेचे जंगल असल्याने सदर क्षेत्रावर वनीकरण घेण्याकरीता वाव नाही.परंतू सदर क्षेत्रात जल व मृद संधारणकामे घेण्यासाठी क्षेत्र योग्य असल्याने तसेच सदरचे क्षेत्र वनालगत असल्याने त्या क्षेत्राचे व्यवस्थापन करणे सोईचे होऊ शकते.त्यामुळे मौजे-मांजरे ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर येथील गट क्र.४७ मधील क्षेत्र २ हे.१५ आर जमीन पर्यायी क्षेत्र म्हणून प्रस्तुत प्रस्तावा अंतर्गत देणेस हरकत नाही.असे कळवले आहे.

त्याअर्थी वाचले क्र.८ अन्वये महसूल व वन विभाग कडील शासन अधिसूचनेन्वये यातील तरतुदीनुसार व वाचले क्र.९ अन्वये दिले अधिकाराचा वापर करून मी अपर जिल्हाधिकारी,कोल्हापूर वनविभागाचे वनक्षेत्रातून जात असलेल्या केर्ली-कोतोली-नांदगाव-नांदारी राज्य मार्ग क्र.१९१ (कि.मी.००/०० ते कि.मी.२९/५००) भाग केर्ली फाटा-नांदारी जिल्हा कोल्हापूर या रस्त्याची सुधारणा कामामध्ये बाधित होत असलेल्या क्षेत्र २ हे.१५ आर क्षेत्राचे बदल्यात मौजे-मांजरे ता. शाहूवाडी जि.कोल्हापूर येथील सरकारी मुलकीपड जमीन गट नं. ४७ मधील पैकी क्षेत्र २ हे.१५ आर उपवनसंरक्षक,वनविभाग कोल्हापूर यांना उपलब्ध करून देणेबाबत (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम-१९७१) मधील नियम ५ व ६ मधील तरतूदीनुसार तसेच वाचले क्र.८ मधील शासन अधिसूचनेतील परि.क्र.३ (ब) अन्वये भोगाधिकार मुल्य रहीत व सारामाफीने,खालील अटी व शर्तीवर सदर जमिनीचा तावा देण्यात येत आहे.

**(कृपया मागे पहावे)**

**अटी व शर्ती :-**

१. जमीनीचा स्थान दर्शविणार नकाशा सोबत आहे.त्याप्रमाणे स्थान असेल.
२. वनविभाग कोल्हापूर विषयांकित शासकीय जमीन वर्ग केल्यानंतर सदर जमिन भोगवटदार वर्ग-२ या धारणाधिकाराने धारण करील.
३. सदर क्षेत्र वनविभाग कोल्हापूर यांचेकडे वर्ग झाले नंतर, त्यास भारतीय वन कायदा-१९२७ चे कलम २० अन्वये घोषीत करणेत येवून संरक्षीत करणेत यावे.
४. वनविभाग कोल्हापूर हे विषयांकित शासकीय जमिनीचा वापर केवळ मंजुर प्रयोजनासाठी करतील अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमिनीचा अथवा त्याचा कोणत्याही भागाचा तात्पुरता अथवा कायमस्वरूपी वापर करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.
५. जमिनीचा ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून सरंक्षण करण्याची जबाबदार वन विभाग कोल्हापूर यांची राहील.सदरील जमीनीचा वापर विहीत कालावधीत करणे बंधनकारक राहिल.
६. ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे,त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनास परत करावी लागेल.
७. प्रस्तावित प्रयोजनाच्या व सुरक्षेच्या अनुषंगाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागानी निर्गमीत केलेले आदेश/सुचना या प्रकरणी बंधनकारक राहतील व त्यानुसारच आवश्यक खबरदारी/काळजी घेणे बंधनकारक राहील.
८. प्रस्तावीत प्रयोजनामुळे लगतच्या खातेदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही.यांच्या वैध वहिवाटेस बाधा येणार नाही तसेच सदर जागेस पोहच रस्ता उपलब्ध करण्याची कार्यवाही वनविभाग कोल्हापूर यांनी करणे आवश्यक राहील.
९. शासकीय जमिन मंजूरी संदर्भातील इतर नियमीत अटी या ठिकाणी लागू राहतील.
१०. प्रस्तुत जमिनीचा ताबा देण्यापुर्वी राज्य शासनाच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत अभिप्रमाणीत हमीपत्र व शासनाचे महसूल व वन विभागकडील परिपत्रक क्र.संकीर्ण०५/२००६/प्र.क्र.४३/ज-१/दिनांक ३१/१०/२००६ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत करारनामा करून घेणे बंधनकारण राहील.
११. शासन परिपत्रक क्र.जमीन ०८/२०१२/प्रक्र ५१/ज-१ दिनांक २३/१०/२०१२ अन्वये शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम ४९ अन्वये जमीन मंजूरीचा नमुना क्र.१८ चा कायमस्वरूपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे बंधनकारक राहिल.
१२. उपरोक्त अटी व शर्तींचा भंग केल्यास जमिन शासन जमा करणेस पात्र होईल.

सही/-
( किशोर पवार )
**अपर जिल्हाधिकारी**
**कोल्हापूर**

**प्रतिलिपी,**

१. मा.उपसचिव,महसूल व वनविभाग मंत्रालय,मुंबई यांना महितीस्तव सविनय सादर
२. मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना महितीस्तव सविनय सादर
३. कार्यकारी अभियंता,विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग,कोल्हापूर यांना माहितीस्तव
४. उपवनसंरक्षक कोल्हापूर यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव
५. उपविभागीय अधिकारी पन्हाळा यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव
६. तहसिलदार शाहूवाडी यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरील जमीनीचा ताबा उपवनसंरक्षक कोल्हापूर यांना देवून ताबा पावती तसेच अधिकार अभिलेखात तत्संबंधीत नोंद घेऊन त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.
७. उप अधिक्षक भुमी अभिलेख शाहूवाडी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव
८. आदेश संचिका

( किशोर पवार )
**अपर जिल्हाधिकारी**
**कोल्हापूर**

( महाराष्ट्र जमीन महसुल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम १० )

गाव :- मांजरे तालुका :- शाहुवाडी जिल्हा :- कोल्हापूर

| नोंदीचा अनुक्रमांक | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप | परिणाम झालेले भुमापन व उपविभाग क्रमांक | अधिकाऱ्याचे नाव , आद्याक्षरी व शेरा |
|---|---|---|---|
| 750 | फेरफाराचा प्रकार : अनोंदणीकृत<br>नोंदीचा प्रकार : आदेश व दस्तावेज फेरफाराचा दिनांक : 15/12/2022 / माहिती मिळाल्याचा दिनांक - 18/11/2022<br>अधिकारी : अप्पर जिल्हाधिकारी , कोल्हापूर<br>आदेश क्रमांक : क्र.कार्या ३-अ/जमिन मागणी/एसआर/१३२/22<br>आदेश दिनांक : 28/10/2022<br>अप्पर जिल्हाधिकारी , कोल्हापूर यांचेकडील आदेश क्रमांक क्र.कार्या ३-अ जमिन मागणी एसआर १३२/22 दि.28/10/2022 नुसार वनविभागाचे वनक्षेत्रातून जात असलेल्या केर्ली-कोतोली-नांदगाव-नांदारी राज्य मार्ग क्र. १९१ (कि.मी. २९/५००) भाग केर्ली-नांदारी जिल्हा कोल्हापूर या रस्त्याची सुधारणा कामांमध्ये बाधित होत असलेल्या क्षेत्र 2 हे. 15 आर. क्षेत्राचे बदल्यात मौजे-मांजरे ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर येथील सरकारी मुलकीपड जमीन गट नं. ४७ मधील पैकी क्षेत्र 2 हे. 15 आर. उप वनसंरक्षक , वनविभाग कोल्हापूर याना उपलब्ध करून देणेबाबत,सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम-१९७१) मधील नियम 5 व 6 मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब महसूल व वन विभाग मंत्रालय , मुंबई दि. ३१ डिसेंबर २०१५ मधील शासन अधिसूचनेतील परि. क्र.३ (ब) अन्वये भोगाधिकार मुल्य रहित व सारा माफीने , खालील अटी व शर्तीवर सदर जमिनीचा ताबा देण्यात येत आहे.<br>अटी व शर्ती -<br>1) जमिनीचा स्थान नकाशाप्रमाणे असेल.<br>2) वनविभाग कोल्हापूर विशायांकित शासकीय जमीन वर्ग केल्यानंतर सदर जमीन भोगवटदार वर्ग 2 या धारणाधिकाराणे धारण करील.<br>3) सदर क्षेत्र वाविभाग कोल्हापूर यांचेकडे वर्ग झाले नंतर , त्यास भारतीय वन कायदा-१९२७ चे कलम 20 अन्वये घोषित करणेत येऊन संरक्षित करणेत यावे.<br>4)वनविभाग कोल्हापूर हे विषयांकित शासकीय जमिनीचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठी करतील अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमिनीचा अथवा त्याचा कोणताही भागाचा तात्पुरता अथवा कायमस्वरूपी वापर करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.<br>5) जमिनीचा ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी वन विभाग कोल्हापूर यांची राहील. सदरील जमिनीचा वापर विहित कालावधीत करणे बंधनकारक राहील.<br>6) ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे , त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनास परत करावी लागेल.<br>7) प्रस्तावित प्रयोजनाच्या व सुरक्षेच्या अनुषंगाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांनी निर्गमित केलेले आदेश/सूचना या प्रकरणी बंधनकारक राहतील व त्यानुसारच आवश्यक | 47(मांजरे)<br>एकूण : 1 | आदेशाची प्रत पाहिली आहे मा.अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडील आदेश क्र.कार्या ३-अ जमीन मागणी/एस आर/१३२/२२ प्रमाणे तसेच मा.तहसीलदार शाहुवाडी यांचेकडील पत्र क्र.जमीन/वशी/११३३/२०२२ नुसार नोंद प्रमाणित<br><br>(राजेंद्र शामराव [illegible])<br>मंडळ अधिकारी , [illegible]<br>ता.: शाहुवाडी<br>जि.:कोल्हापूर<br>दि. 15/12/2022 |

फक्त कार्यालयीन कामासाठी निःशुल्क प्रत



Scanned with CamScanner

अहवाल दिनांक 15/12/2022

महाराष्ट्र शासन

गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

( महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७ )

गाव :- मांजरे ( 567072 ) तालुका : शाहूवाडी जिल्हा : कोल्हापूर

ULPIN 13157558379 भूमापन क्रमांक व उपविभाग : 47

भू-धारणा पध्दती : सरकार शेताचे स्थानिक नाव : राजवाडी

| क्षेत्र, एकक व आकारणी | खाते क्र. | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र आकार पो.ख. फेरफार | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|---|---|
| क्षेत्राचे एकक हे.आर.चौ.मी.<br>अ) लागवड योग्य क्षेत्र<br>जिरायत -<br>बागायत -<br>ब) पोट-खराब क्षेत्र (लागवड अयोग्य)<br>वर्ग (अ) 42.85.00<br>वर्ग (ब) -<br>एकूण पो.ख. 42.85.00<br>एकूण क्षेत्र (अ+ब) 42.85.00<br>आकारणी 0.00<br>जुडी किंवा विशेष आकारणी - | 163<br>249<br>301 | सरकारी पुरविंग पड<br>महाराष्ट्र शासन वन विभाग<br>उपवनसंरक्षक वनविभाग कोल्हापूर | 34.94.00 ([illegible])<br>5.76.00 ([illegible])<br>2.15.00 ([illegible]) | इतर कुळे नाव व खंड<br>इतर अधिकार<br>प्रलंबित फेरफार : नाही.<br>शेवटचा फेरफार क्रमांक : 190 व दिनांक 15/12/2022 |
| जुने फेरफार क्र. : ( 70 )( 1 )( 90 )( 235 )( 237 )( 300 )( 302 )( 303 )( 384 )( 391 )( 392 )( 393 )( 394 )( 395 )( 396 )( 398 )( 400 )( 401 )( 406 )( 415 )( 416 )( 420 )( 424 )( 428 )( 435 )( 436 )( 438 )( 440 )( 447 )( 453 )( 455 )( 457 )( 670 ) | | | | सीमा आणि भुमापन चिन्हे |

गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

( महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ )

गाव :- मांजरे ( 567072 ) तालुका :- शाहूवाडी जिल्हा :- कोल्हापूर

भूमापन क्रमांक व उपविभाग : 47

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | हंगाम | खाता क्रमांक | पिकाचा प्रकार | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | स्वरूप | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | हे.आर. चौ.मी | हे.आर. चौ.मी | | | हे.आर. चौ.मी | |

टीप : * सदरची नोंद मोबाइल ॲप द्वारें घेणेत आलेली आहे

"सदर दस्तावेज हा केवळ अंतर्गत शासकीय कार्यवाहीसाठी उपलब्ध आहे. खाजगी वापर केल्यास योग्य दंड/शिक्षा केली जाईल याची नोंद घ्यावी."

दिनांक :- 15/12/2022

सांकेतिक क्रमांक :- 273400010418570000122022150

( नाव :- मिलिंद भूपाल चव्हाण )

तलाठी मांजरे ता :- शाहूवाडी जि :-कोल्हापूर

तलाठी सजा मांजरे ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर.

Scanned with CamScanner

## गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७ ]

व :- मांजरे ( 567072 ) तालुका :- शाहूवाडी जिल्हा :- कोल्हापुर

LPIN : 13157558379 भूमापन क्रमांक व उपविभाग : 47

1315755837

भू-धारणा पध्दती : **सरकार** शेताचे स्थानिक नाव : **राजवाडी**

| क्षेत्र, एकक व आकारणी | | खाते क्र. | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फे.फा. | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ाचे एकक | हे.आर.चौ.मी | 163 | सरकारी मुलकी पड | | | 34.94.00 | ( 750 ) | कुळाचे नाव व खंड |
| अ) लागवड योग्य क्षेत्र | | 249 | महाराष्ट्र शासन वन विभाग | | | 5.76.00 | ( 670 ) | इतर अधिकार |
| ायत | - | 301 | उप वनसंरक्षक वनविभाग कोल्हापूर | | | 2.15.00 | ( 750 ) | प्रलंबित फेरफार : नाही. |
| ायत | - | | | | | | | शेवटचा फेरफार क्रमांक : 750 व दिनांक : 15/12/2022 |
| ब) पोट-खराब क्षेत्र (लागवड अयोग्य) | | | | | | | | |
| (अ) | 42.85.00 | | | | | | | |
| (ब) | - | | | | | | | |
| कुण पो.ख. | 42.85.00 | | | | | | | |
| कुण क्षेत्र (अ+ब) | 42.85.00 | | | | | | | |
| कारणी | 0.00 | | | | | | | |
| ी किंवा विशेष कारणी | - | | | | | | | |

फेरफार क्र. ( 0 )( 1 )( 90 )( 235 )( 237 )( 300 )( 302 )( 303 )( 384 )( 391 )( 392 )( 393 )( 394 )( 395 )( 396 )( 398 )( 400 )( 401 )( 406 )( 415 )( 416 )( 420 )( 424 )( 428 )( 435 436 )( 438 )( 440 )( 447 )( 453 )( 455 )( 457 )( 670 )

सीमा आणि भुमापन चिन्हे :

चना : या संकेतस्थळावर दर्शविलेली माहिती ही कोणत्याही शासकीय अथवा कायदेशीर बाबींसाठी वापरता येणार नाही.

## गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ ]

गाव :- मांजरे ( 567072 ) तालुका :- शाहूवाडी जिल्हा :- कोल्हापुर

मापन क्रमांक व उपविभाग : 47

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | हंगाम | खाता क्रमांक | पिकाचा प्रकार | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | स्वरुप | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | हे.आर. चौ.मी | हे.आर. चौ.मी | | | हे.आर. चौ.मी | |

प : * सदरची नोंद मोबाइल अ्प द्वारें घेणेत आलेली आहे

वना : या संकेतस्थळावर दर्शविलेली माहिती ही कोणत्याही शासकीय अथवा कायदेशीर बाबींसाठी वापरता येणार नाही.

VIEW ONLY – NOT FOR LEGAL PURPOSE